मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | सोमवार, दि. 15 जुलै 2024 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर मानांकन

## 16 विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर मानांकन मिळवले : गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्ती

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फ़त घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांतील १६ विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर मानांकन मिळवले असून ही बाब अभिमानास्पद आहे, असे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फ़त घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल जाहिर झाला आहे. यामध्ये १३२ विद्यार्थी पुणे जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आले आहेत. त्यापैकी १६ विद्यार्थी हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांतील आहेत. उर्दू शाळा आकुर्डी, उर्दू शाळा रुपीनगर, उर्दू शाळा थेरगाव, उर्दू शाळा खराळवाडी, उर्दू शाळा चिंचवड, उर्दू शाळा जाधववाडी, उर्दू शाळा लांडेवाडी, मुलांची शाळा मोशी, उर्दू शाळा दापोडी, उर्दू शाळा नेहरूनगर, मुलींची शाळा दिघी, अण्णासाहेब मगर माध्यमिक शाळा पिंपळे सौदागर या महापालिकेतील शाळांतील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा स्तरावर गुणवत्ता यादीत आले आहेत. गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या इयत्ता ५ वी आणि ८ वी तील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या प्रमाणपत्रासह १० महिन्यांसाठी अनुक्रमे ५०० रुपये प्रती महिना आणि ७५० रुपये प्राप्त होणार आहे.

गेल्या दोन शैक्षणिक वर्षांच्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हास्तरीय क्रमवारी प्राप्त केलेल्या १९ सार्वजनिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी पिंपरी-चिंचवड महानगपालिकेच्या वतीने भारत दर्शन अभ्यास दौरा आयोजित केला होता. हे विद्यार्थी गेल्या वर्षी १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत बंगलोर, म्हैसूर, उटी आणि कोईम्बतूर या शहरांचा समावेश असलेल्या दक्षिण भारताच्या प्रवासाला गेले होते. त्यांच्यासोबत सात शिक्षक होते ज्यांनी त्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीत त्यांना मार्गदर्शन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) तसेच भारतीय विज्ञान संस्थेतील वैज्ञानिकांशी संवाद साधण्याची तसेच प्रसिद्ध शैक्षणिक संस्थांचे अन्वेषण करण्याची अनोखी संधी देखील विद्यार्थ्यांना मिळाली आहे. गतवर्षीप्रमाणेच या वर्षी देखील जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे नियोजन करण्यात आले आहे.



"या शिष्यवृत्ती परीक्षांमधील आमच्या विद्यार्थ्यांचे यश हे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता अधोरेखित करते. जास्तीत जास्त उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आमच्या विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

\- प्रदिप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.

"शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आमचे सततचे प्रयत्न या उत्कृष्ट निकालांवरून दिसून येतात. शिष्यवृत्ती निधी हे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात खूप मदत करेल.

\- विजयकुमार थोरात, सहायक आयुक्त, शिक्षण विभाग, महापालिका.

---

# महाराष्ट्रात विधान परिषद अस्तित्वात आल्यापासून प्रथमच मातंग समाजाला प्रतिनिधित्व!

## सामाजिक कार्यकर्त्या कीर्ती जाधव यांची भावना : अमित गोरखे यांच्या विजयाने अन्याय दूर झाला!

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानपरिषद अस्तित्वात आल्यापासून प्रथमच मातंग समाजाला प्रतिनिधित्व देण्यात आले. पिंपरी चिंचवड: मा.अमित गोरखे यांना विधानपरिषदेवर संधी देऊन महायुती सरकारने मातंग समाजावर झालेला हा अन्याय दूर केला, अशा भावना सामाजिक कार्यकर्त्या कीर्ती जाधव यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून राज्य विधानपरिषदेवर मातंग समाजाला आतापर्यंत प्रतिनिधित्व मिळाले नव्हते. महाराष्ट्रात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत क्रमांक दोनवर असलेल्या मातंग समाजाला आतापर्यंत एकदाही विधानपरिषदेवर नियुक्ती मिळालेली नव्हती. हा मातंग समाजावरचा राजकीय अन्याय होता. अगोदरच मातंग समाज सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात मागासलेला आहे.या मागासलेल्या समाजाचा सर्व क्षेत्रात विकासात्मक दर्जा उंचावण्याकरिता राज्य विधानपरिषदेवर संधी मिळणे आवश्यक होते. २०२१ हे वर्ष साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे जन्मशताब्दी वर्ष होता, त्याच काळात या मातंग समाजाला विधानपरिषदेवर प्रतिनिधित्व देऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यांचा, त्यांच्या संयुक्त महाराष्ट्रातील चळवळ व कामगार चळवळीतील योगदानाचा यथोचित सन्मान होणे अपेक्षित होते परंतु तसे झाले नाही.

सध्याच्या महायुती सरकारने विशेष करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मातंग समाजातील माननीय आमदार अमित गोरखे उच्चशिक्षित, होतकरू व्यक्तीस न्याय देऊन प्रथमच मातंग समाजाचे प्रतिनिधी मा.अमित गोरखे यांना विधान परिषदेवर संधी देऊन सन्मानित केले आहे.





### स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही संधी मिळावी...

» विधानपरिषदेवर मातंग समाजाच्या नेत्याची निवड झाल्याने मातंग समाजामध्ये मागासवर्गीयांकरिता झटणारे व सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे, उच्च विद्याविभुषित सामाजिक व सार्वजनिक समस्यांची जाण असलेले, विविध क्षेत्रामध्ये अभ्यासू व अनुभव असणारे मातंग समाजाचे अनेक नेते माननीय अमित गोरखे यांना प्रतिनिधित्व देऊन महाराष्ट्राने पहिल्यांदाच मातंग समाजाला न्याय दिल्याने पिंपरी चिंचवड शहरातील मातंग समाजाचे नेते कीर्तीताई मारुती जाधव यांनी समाधान व्यक्त केले आहे. याचीच पुनरावृत्ती करत स्थानिक स्वराज्य संस्थेत सुद्धा मातंग समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, असेही आपल्या निवेदनात म्हटले आहे.

# महिलांना 46 हजार कोटी उपलब्ध करुन देणार : अजित पवार

## राज्याच्या सुरक्षित भवितव्यासाठी तसेच जनतेच्या कल्याणासाठी महायुती सरकार कटिबध्द आहे

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या वेळेस चुकीचा नरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न केला. विधानसभेला मात्र अशा चुकीच्या नरेटिव्हला बळी पडू नका, असेही आवाहन अजित पवार यांनी केले.

राज्याच्या सुरक्षित भवितव्यासाठी तसेच जनतेच्या कल्याणासाठी महायुती सरकार कटिबध्द असून समाजातील सर्वच घटकांना पुरेसा न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. अर्थसंकल्पातून जनसन्मानाचीच भूमिका राज्य सरकारने घेतली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने बारामतीत आयोजित जनसन्मान मेळाव्यात अजित पवार बोलत होते. प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, खासदार प्रफुल्ल पटेल व सुनेत्रा पवार यांच्यासह छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, अनिल पाटील, धर्मराव अत्राम, संजय बनसोडे, रामराजे नाईक निंबाळकर, रुपाली चाकणकर यांच्यासह अनेक आमदार व पदाधिकारी या प्रसंगी उपस्थित होते.

सभेच्या सुरवातीपासूनच पावसाच्या सरी कोसळत होत्या. अजित पवार यांचे भाषण सुरु होतानाच पावसाला प्रारंभ झाल्यावर कार्यकर्ते पावसात भिजत असल्याचे पाहून स्वत: अजित पवार व्यासपीठावर समोर आले व पावसात उभे राहून त्यांनी भाषण सुरु केले अजित पवार म्हणाले, अर्थसंकल्पात मांडलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केलेली असून या माध्यमातून राज्यातील पात्र महिलांना 46 हजार कोटी रुपये राज्य सरकार उपलब्ध करुन देणार आहे. महिलांसह शेतकरी, विद्यार्थी, वारकरी, दुर्बल घटकांसाठीही अर्थसंकल्पात सरकारने काही तरी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पायाभूत सुविधा निर्मितीसह अन्य क्षेत्रातील महत्त्वाच्या योजनांना गती दिली जाणार आहे. उसाची एमएसपी (किमान विक्री किंमत) वाढविण्याबाबत केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांना विनंती केली असून त्यांना उद्याच लेखी निवेदन देणार आहे. कांदा आयात केलेला नसल्याचेही त्यांनी नमूद केले.




### पावसाने माहोलच बदलला....

» या सभेच्या सुरवातीपासूनच पावसाच्या सरी कोसळत होत्या. अजित पवार यांचे भाषण सुरु होतानाच पावसाला प्रारंभ झाल्यावर कार्यकर्ते पावसात भिजत असल्याचे पाहून स्वत: अजित पवार व्यासपीठावर समोर आले व पावसात उभे राहून त्यांनी भाषण सुरु केले. त्यांच्यासमवेत मंत्रीमंडळातील सर्वच मंत्री त्यांच्या बाजूला येऊन पावसात उभे राहिले, त्या नंतर कार्यकर्त्यांनी एकच वादा अजितदादा अशा घोषणा सुरु केल्या. सर्वच मान्यवर पावसातच अजित पवार यांचे भाषण होईपर्यंत थांबून होते.

### चुकीच्या नरेटिव्हला बळी पडू नका..

» लोकसभा निवडणुकीच्या वेळेस चुकीचा नरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न केला. विधानसभेला मात्र अशा चुकीच्या नरेटिव्हला बळी पडू नका, असेही आवाहन अजित पवार यांनी केले. राज्य सरकार ग्राहकांचे हित जोपासण्यासोबतच शेतक-यांच्या मालालाही योग्य भाव मिळायला हवा याची काळजी घेत असल्याचा उल्लेख त्यांनी केला. भावनिक होऊ नका, प्रश्न सोडविण्यासाठी विकासाच ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करावी लागते, असेही त्यांनी नमूद केले.

### राज्यात राष्ट्रवादीची जनसंवाद यात्रा...

» राज्याच्या विविध भागात अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादीच्या वतीने जनसंवाद यात्रेचे आयोजन केले जाणार असल्याचे सुनिल तटकरे यांनी या वेळी नमूद केले.

# पुण्यातील JEE चे कोचिंग सेंटर बंद,शेकडो विद्यार्थ्यांनी भरले लाखो रुपये

## शहरातील फिटजी कोचिंग क्लास एका रात्रीतून बंद, शेकडो विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये घेऊन कोचिंगचे संचालक फरार

**पुणे | प्रतिनिधी**

अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखेत प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षा सुरु झाल्यापासून "कॉलेज बंद अन् कोचिंग सुरु", अशी परिस्थिती झाली. आता विद्यार्थी महाविद्यालयात जात नाही. दहावी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी बड्या कोचिंगमध्ये प्रवेश घेतो. त्यासाठी लाखो रुपयांचे शुल्क भरतो. कोचिंगमध्येच अकरावी, बारावी जीईई अन् नीटची तयारी सुरु होते. परंतु कोचिंग निवडताना पालकांनी सावध राहण्याची गरज आहे. पुणे शहरातील फिटजी कोचिंग क्लास एका रात्रीतून बंद झाले आहे. शेकडो विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये घेऊन कोचिंगचे संचालक फरार झाले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये फिटची कोचिंग सेंटर आहे. या कोचिंगमध्ये जीईईची तयारी करण्यासाठी 300 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्यासाठी पालकांनी लाखो रुपये शुल्क त्या कोचिंगमध्ये भरले. परंतु हे कोचिंग एका रात्रीतून बंद पडले. कोचिंगचे संचालक फरार झाले आहेत. आता विद्यार्थ्यांचे पालक पोलीस ठाण्याच पोहचले आहेत. अनेक पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यात आश्रू आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

प्रीतम पांडे या पालकाने सांगितले की, पिंपरी चिंचवडमधील फिटजी कोचिंगमध्ये मुलीचा प्रवेश घेतला होता. आठवड्यापूर्वी कोचिंग सेंटरचे प्रमुख राजेश कर्ण यांच्याशी चर्चा झाली होती. त्यांनी कोचिंग बंद होणार असल्याचे अनौपचारिक चर्चेत सांगितले. काही माहिती मिळण्याआधीच कोचिंगला कुलूप लावून संचालक फरार झाले आहेत.




### तक्रार नोंदवली अन्...

» फिटजी कोचिंगचे एक सेंटर पिंपरी चिंचवडमध्ये तर दुसरे स्वारगेटमध्ये आहे. या कोचिंगमध्ये 300 पेक्षा अधिक विद्यार्थी आहेत. दोन्ही केंद्रावर जीईईची तयारी करुन घेतली जाते. आठवीपासून प्रवेश सुरु होतात. प्रत्येक वर्षी अडीच लाख रुपये शुल्क घेतले जाते. चिंचवड पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र कोळी यांनी पालकांची तक्रार नोंदवून घेतली असल्याचे सांगितले. तसेच शिक्षण विभागाला या प्रकरणाची माहिती दिली आहे.

### पालक म्हणतात, 2.5 लाख रुपये भरले

» कोचिंगमधील कर्मचाऱ्यांनी पगार व भाडे दिले जात नसल्याचे सांगितले होते. त्यानंतर हे केंद्र अचानक बंद करण्यात आले. एका पालकाने सांगितले की, त्यांची मुलगी अकरावीत शिकते. त्याने आपल्या मुलीला FIITJEE मध्ये प्रवेश घेतला. कोचिंग क्लाससाठी 2.5 लाख रुपये एकरक्कमी शुल्क भरले. परंतु आता संचालक फरार झाले आहे.

# पालिकेकडून थेट पध्दतीने 21 वाहनांची खरेदीत

## महापालिकेच्या वैद्यकीय, उद्यान आणि मध्यवर्ती औषध भांडार विभागाच्या वापरासाठी एस ईव्ही मल्टी युटिलिटी वाहने खरेदी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय, उद्यान आणि मध्यवर्ती औषध भांडार विभागाच्या वापरासाठी २१ टाटा एस ईव्ही मल्टी युटिलिटी वाहने खरेदी केली जात आहेत. त्यासाठी निविदा न राबविता मे. टाटा मोटर्स लिमिटेड कंपनीला थेट पध्दतीने हे काम देण्यात आले आहे. वाहनांच्या किंमतीपोटी कंपनीला देय असणारी एकूण रक्कम २ कोटी ३८ लाख ८७ हजार अदा करण्यास आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

महापालिकेच्या उद्यान, वैद्यकीय व मध्यवती औषध भांडार विभागाच्या वापरासाठी २१ ईव्ही मल्टी युटिलिटी वाहनांची आवश्यकता आहे. शहरातील मे. टाटा मोटर्स लिमिटेड कंपनी वाहने उपलब्ध करुन देणार आहे.

कोणत्याही कामासाठी महापालिकेकडून रितसर निविदा प्रक्रिया राबवून दर घेतले जातात. परंतु, वाहने खरेदी कामी निविदा न राबविता, कोणत्याही प्रकारचा करारनामा न करता थेट पध्दतीने वाहनांची खरेदी केली जात आहे

२१ वाहनांच्या खरेदीसाठी २ कोटी ३८ लाख ८७ हजार एवढा खर्च अपेक्षित आहे. वाहनांची चॅसी बनविण्याचा खर्च १ कोटी ९९ लाख रुपये, बॉडी बिल्डींगची किंमत ३८ लाख ३२ हजार ६४० एवढा खर्च लावण्यात आला आहे.

तर, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणीसाठी प्रति वाहन ५००० रुपये प्रमाणे १ लाख ५०० एवढा खर्च येत आहे. एवढी रक्कम अदा करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. तथापि, वाहनांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च यात लावण्यात आलेला नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्तीचा खर्च वाढणार आहे..

गुरे वाहन्यासाठी ठेकेदाराला ६ महिन्यांची मुदतवाढ पशुवैद्यकीय विभागाकडील गुरे वाहतूक करण्यासाठी वाहने पुरविणा-या मे. एस. टी. मोटर्स यांचा आठरा महिन्यांचा निविदा कालावधी २१ फेब्रुवारी २०२४ रोजी संपुष्टात आला. त्यानंतर याकामी निविदा प्रस्तावित करण्यात आली. परंतु, त्याला वेळ लागणार असल्याने अत्यावश्यक सेवेतील काम बंद पडू नये यासाठी संबंधित ठेकादाराला २ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली.

मुदत देखील संपल्यानंतर पशुवैद्यकीय विभागाकडून संबंधित ठेकेदाराच्या मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आला. दरम्यान, निविदा प्रस्तावित करण्यासाठी विलंब लागत असल्याचे कारण देऊन ठेकेदाराला ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली. त्याकामी येणा-या ३१ लाख रुपये एवढ्या वाढीव खर्चाच आयुक्त सिंह यांनी स्थायीच्या सभेत मान्यता दिली.



### गुरे वाहन्यासाठी ठेकेदाराला 6 महिन्यांची मुदतवाढ

» पशुवैद्यकीय विभागाकडून संबंधित ठेकेदाराच्या मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आला. दरम्यान, निविदा प्रस्तावित करण्यासाठी विलंब लागत असल्याचे कारण देऊन ठेकेदाराला ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली. त्याकामी येणा-या ३१ लाख रुपये एवढ्या वाढीव खर्चाच आयुक्त सिंह यांनी स्थायीच्या सभेत मान्यता दिली.

### देखभाल दुरुस्तीचा खर्च वाढणार

» प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणीसाठी प्रति वाहन ५००० रुपये प्रमाणे १ लाख ५०० एवढा खर्च येत आहे. एवढी रक्कम अदा करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. तथापि, वाहनांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च यात लावण्यात आलेला नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्तीचा खर्च वाढणार आहे.

# मोकाट जनावरांमुळे नागरिक त्रस्त, कारवाई बासनात

## मोकाट जनावरांमुळे शहरातील वाहतुकीला अडथळा, वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोकाट जनावरांमुळे शहरातील वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे. मोकाट जनावरांना पकडण्याची मोहीम महापालिकेने मधल्या काळात हाती घेतली. मात्र, रस्त्यांवर फिरणाऱ्या जनावरांची संख्या मात्र कमी झालेली नाही. त्यामुळे, सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. मागील काही दिवसांपासून या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी वाढल्या असल्या तरी महापालिकेकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.

शहरातील वेगवेगळ्या मार्गांवरील आणि वस्त्यांमधील रस्त्यांवर पाळीव आणि मोकाट जनावरे ठाण मांडून बसत आहेत. त्याचा वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. पिंपरीगावातील पॉवर हाउस चौकापर्यंतच्या मार्गावर एक महाविद्यालयीन विद्यार्थी मोकाट जनावर रस्त्यावर आडवे आल्याने पडून गंभीर जखमी झाला. जुनी सांगवी, संत तुकारामनगर, नेहरूनगर, मासुळकर कॉलनी, काळेवाडी या मार्गांवर जनावरे रस्त्यावर असल्यामुळे अनेकदा वाहतूक खोळंबते. जनावरे रस्त्याच्या मधोमध बसलेली किंवा उभी असतात. त्यामुळे, अनेकदा अपघात होतात.



### मालक देतात जनावरांना सोडून

» शहरात गेल्या वर्षात जनावरांमुळे झालेल्या अपघातात अनेक जण जखमी झाल्याच्या नोंदी आहेत. जनावरांचे मालक सकाळच्यावेळी त्यांना मोकळे सोडून देतात. त्यांना पकडण्यासाठी महापालिकेचे पथक पोहोचत नाही. त्यामुळे या गंभीर समस्येपासून सुटका काही होत नसल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. दुसरीकडे आठवडे बाजार, फुल बाजार परिसरात वर्षभर मोकाट जनावरे भटकत असताना दिसून येतात.

> पिंपरीगाव, पॉवर हाउस चौक मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा होत आहे. मोकाट जनावरांच्या कळपांमुळे चालण्यास अडचण येत आहे.
>
> - सुहास कुदळे, पिंपरीगाव

# पूजा खेडकरच्या आई-वडिलांसह 5 जणांवर गुन्हा दाखल

## जमिनीच्या वादातून शेतकऱ्यांना धमकी, पौड पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालयात रुबाब दाखविणाऱ्या आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबीयांचे एक- एक कारनामे बाहेर येत आहेत. पूजाच्या आईने जमीन खरेदीच्या वादातून शेतकऱ्यांनाच चक्क पिस्तूल दाखविले असल्याचा जुना व्हिडीओ व्हायरल झाला असल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पूजाची आई मनोरम खेडकर आणि वडील दिलीप खेडकर यांच्यासह इतर ५ जणांविरुद्ध पुणे ग्रामीण पोलिसाात गुन्हा दाखल झाला आहे.

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर सतत वादात सापडत आहेत. ओबीसी आरक्षणाचा गैरवापर करण्यापासून आयएएसची नोकरी मिळवण्यापर्यंत अनेक प्रकारचे आरोप त्यांच्यावर होत आहेत. आता पूजाचे आई-वडील देखील गोत्यात येत आहेत. मनोरमा खेडकर यांनी आपल्याला धमकावल्याचा आरोप करणाऱ्या शेतकऱ्याच्या तक्रारीच्या आधारे पौड पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री गुन्ह्या नोंद झाला आहे. आयपीसी कलम ३२३, ५०४, ५०६ अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला असल्याचे पौड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज यादव यांनी सांगितले.

निवड झाल्यानंतर रूजू होण्यापूर्वीच खेडकर यांनी आपल्या पदाचा रूबाब दाखविण्यास सुरुवात केली. अत्यावश्यक सोयीसुविधांयुक्त केबीन, राहण्यासाठी निवास, दिमतीला कर्मचारी अशी मागणी सुरु केली. इतकेच नव्हे तर जिल्हाधिकारी कार्यालयात काम करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या केबिनवर परस्पर ताबा मारत त्यांनी तेथे बेकायदेशीर पद्धतीने आपला कार्यालय देखील सुरू केले होते. अधिकारी, कर्मचारी यांना जाब विचारणे, त्यांना त्रास देणे असे प्रकार त्यांनी केले. त्यामुळे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी त्यांची तक्रार राज्य सरकारकडे करत त्यांच्या वागणुकीचा अहवाल पाठविला होता.



### शेतकऱ्यांना धमकावल्याचा जुना व्हिडीओ व्हायरल

» कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे. त्या आयएएस अधिकारी पूजा खेडकर त्यांच्या आई आणि सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झालेल्या दिलीप खेडकर यांच्या पत्नी मुळशी तालुक्यातील घडवली गावात पासलकर आणि मरगळे कुटुंबीय वडिलोपार्जित भातशेती कसतात. काही महिन्यांपूर्वी पासलकर कुटुंबातील एकाला हाताशी धरून पूजा खेडकर यांच्या नावाने जमीन खरेदी करण्यात आली. त्यानंतर खेडकर कुटुंबाची अरेरावी सुरू झाली. जेवढी जमीन खरेदी करण्यात आली त्यापेक्षा जास्त जमिनीवर खेडकर कुटुंबाने दावा करायला सुरुवात केली. मात्र, शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला तेव्हा पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांनी चक्क पिस्तूल काढून या शेतकऱ्यांना धमकावत असल्याचे वास्तव समोर आले आहे. या शेतकऱ्यांनी जेव्हा पोलिसांकडे त्यांची तक्रार करण्याचा प्रयत्न केला तेव्हा पोलिसांनी देखील दाद दिली नसल्याने मुळशी पॅटर्न'चा प्रत्यय या ठिकाणी पाहायला मिळाला.

### खेडकरांच्या बंगल्यातून कार गायब

» पूजा खेडकर यांना पुणे पोलिसांचे नोटीसवजा समजपत्र मिळताच त्यांच्या बाणेरमधील बंगल्यातून आलिशान कार गायब करण्यात आली आहे. बाणेरमधील बंगल्यात वादातील कार झाकून ठेवण्यात आली होती. पुणे पोलिसांनी नोटीस बजावून वाहन चतुःश्रृंगी वाहतूक विभागात सादर करण्यास सांगितल्यानंतर शुक्रवारी (१२ जुलै) ही कार बंगल्यातून हलविण्यात आली आहे. याच कारवर अंबर दिवा लावून खेडकर या जिल्हाधिकारी कार्यालयात जात होत्या. त्याखेरीज बंगल्यात असलेली दुसरी कारही त्यांनी अन्यत्र हलवली आहे.

### शेळ्यांवर कुत्री सोडली

» प्रामुख्याने जमीन सामाईक मालकीची असून, अजून या जमिनीच्या वाटण्या झालेल्या नाहीत, असा पासलकर कुटुंबीयांचा दावा आहे. मात्र, खेडकर कुटुंबाने मनमानी पद्धतीने त्या ठिकाणी जमिनीवर दावा करायला सुरुवात केली. त्याला विरोध करणाऱ्या मरगळे आणि पासलकर कुटुंबाचा जनावरांसाठी साठवून ठेवलेला चारा पेटवून देण्यात आला, तर कधी त्यांच्या शेळ्यांवर कुत्री सोडण्यात आली.

# पवना धरण परिसरात पावसाची दमदार हजेरी

## एका दिवसांत पाणी पातळीमध्ये 3.94 इतकी झाली वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

पवना धरण परिसरात शनिवारी पावसाने दमदार हजेरी लावली त्यामुळे एका दिवसांत पाणी पातळीमध्ये 3.94 इतकी वाढ झाली आहे. आज (रविवारी) सकाळी सहा वाजता धरणातील पाणीसाठा 28.77 टक्के इतका झाला आहे.

पवना धरण परिसरात पावसाने दमदार हजेरी लावली शनिवारी (दि. 13) दिवसभरात 132 मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर पावसाळा सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत 662 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सध्या धरणात 28.77 टक्के इतका पाणीसाठा आहे. तर गेल्यावर्षी आजच्या तारखेपर्यंत 655 मिलिमीटर पाऊस झाला होता. त्यावेळी धरणातील पाण्याची पातळी 30.75 टक्के इतकी होती

पावसाळा सुरू होण्यापूर्वी पवना धरणात 17.43 टक्के इतका पाणीसाठा होता. त्यामध्ये आत्तापर्यंत 11.34 टक्के इतका पाणीसाठा वाढला आहे. पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे एका दिवसांत पाणी पातळीमध्ये 3.94 इतकी वाढ झाली आहे. आज (रविवारी) सकाळी सहा वाजता धरणातील पाणीसाठा 28.77 टक्के इतका झाला आहे. पवना धरण परिसरात काल दिवसभरात 132 मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर पावसाळा सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत 662 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

सध्या धरणात 28.77 टक्के इतका पाणीसाठा आहे. तर गेल्यावर्षी आजच्या तारखेपर्यंत 655 मिलिमीटर पाऊस झाला होता. त्यावेळी धरणातील पाण्याची पातळी 30.75 टक्के इतकी होती. पावसाळा सुरू होण्यापूर्वी पवना धरणात 17.43 टक्के इतका पाणीसाठा होता. त्यामध्ये आत्तापर्यंत 11.34 टक्के इतका पाणीसाठा वाढला आहे. मावळ तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्ह्यामध्ये आता मान्सून चांगलाच सक्रीय झाला आहे

भोर तालुक्यातील शिरगावमध्ये 121 मिलिमीटर, हिरडोशी 120 मिलिमीटर, भूतोंडे 166 मिलिमीटर इतकी पावसाची नोंद झाली आहे. वेल्हा तालुक्यात वेल्हा 128 मिलिमीटर, गिसर 135 मिलिमीटर इतकी पावसाची नोंद झाली आहे. मावळ तालूक्यातील उजनी खंडाळा 235 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.



### परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज

» जिल्ह्यात पावसाचा अंदाज असून, घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुणे जिल्ह्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हा या भागात 100 मिलिमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे. तर मावळ आणि भीमाशंकर परिसरात 200 मिलिमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे.